

# सेवा परमोधर्म

**"सेवा हाच धर्म,
समाजहित हाच आमचा संकल्प!"**

**236 चाकूर-अहमदपूर मतदारस संघाचे जनतेचे अपक्ष उमेदवार**


# बालाजी पाटील चाकूरकर



**16** | **बालाजी पाटील चाकूरकर**
**Balaji Patil Chakurkar**







**प्रेशर कुकर या चिन्हासमोरील
बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करा!**

प्रकाशक : सूरज कापडे, अक्षय काडवदे, अविनाश जाधव,सचिन पाटील, रोहन पाटील | मुद्रक : पवन ऑफसेट | प्रती 3000

# मनोगत

भाजपचा एक निष्ठावान कार्यकर्ता म्हणून मी चाकूर-अहमदपूर मतदारसंघात मागील 41 वर्षांपासून काम करीत आलो आहे. कुठल्याही पदाची किंवा सन्मानाची अपेक्षा न ठेवता पक्षकार्यात नेहमी झोकून देऊन काम केले. पुढील काळातही पक्षाचे काम अत्यंत निष्ठेने सुरुच राहील, यात शंकाच नाही. अत्यंत लहान वयापासून मी पक्षाशी जोडलो गेलो. याचे कारण मी 6 व्या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडलो गेलो. त्यानंतर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत लढा देतानाच विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी सतत प्रयत्नशील राहिलो. हेच संस्कार पुढे माझ्यात रुजत गेले. त्यामुळे मी आपोआपच हिंदुत्ववादी पक्ष म्हणून आणि उच्च विचार, साधनशुचिता असलेला पक्ष म्हणून भाजपची राष्ट्रीय पातळीवर ओळख आहे. त्यामुळे पुढील काळात पक्षकार्यात आपोआप गुंतत गेलो आणि बदलत्या परिस्थितीतही मला योग्य संधी मिळत गेल्याने कार्याचा धडाका पुढेही तसाच सुरु ठेवला. त्यामुळे अहमदपूर-चाकूर मतदारसंघात लोकहिताच्या कार्यातून आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. लोककल्याणासाठी लढणारे युवा नेतृत्व म्हणून माझ्याकडे विद्यार्थी दशेपासूनच पाहिले जात होते. त्यातच लोकहितकारी कार्य असो की, सामाजिक प्रश्नांसाठी लढा असो, यात नेहमीच पुढाकार घेऊन जनतेसाठी मोठा संघर्ष केला. त्यामुळे पक्षाने माझ्यावर अधिक मोठी जबाबदारी टाकायला सुरुवात केली. पक्षाच्या माध्यमातून माझ्यावर जी जबाबदारी दिली, त्या पदाला न्याय देण्याची भूमिका मी सातत्याने अहमदपूर-चाकूर मतदारसंघात घेतली. या कार्यातूनच मतदारसंघात एक वेगळी ओळख निर्माण करु शकलो, याचा सार्थ अभिमान आहे. परंतु पक्षाने दिलेल्या जबाबदारीमुळे मला विविध पदांवर काम करण्याची संधी मिळाली. यातून लोकसेवाही करता आली. त्यामुळेच मी माझी ओळख निर्माण करण्यात यशस्वी झालो. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य केल्याने विद्यार्थ्यांचे प्रश्न असो की, लोकांचे प्रश्न असो त्या प्रश्नांसाठी आपोआपच लढण्याचे बळ येत असे. माझ्यातील लढाऊ बाणा पाहून मला भाजपमध्ये विविध पदांवर संधी मिळत गेल्या. सुरुवातीला भाजपचा शहर मंत्री म्हणून मी भाजपमध्ये आपली राजकीय कारकीर्द सुरु केली. त्यानंतर सरचिटणीसपद मिळाले. प्रमुख जबाबदारी मिळाल्याने मी पक्षाला अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने कामाला लागलो. याच कामाची पावती म्हणून किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्षपद माझ्यावर सोपविले. त्यामुळे जिल्ह्यातील शेतक-यांसह चाकूर, अहमदपूर तालुक्यातील शेतक-यांनाही सोबत घेऊन शेतक-यांच्या प्रश्नांसाठी सत्तेत असताना आणि विरोधात असतानाही लढा दिला. आज माझ्यावर पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी आहे. पक्षाने माझ्यावर मोठा विश्वास दाखवत विविध पदाची जबाबदारी दिली. मीदेखील पक्षनिष्ठा कायम राखून लोकहिताच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले. यात मी कधीच मागे वळून पाहिले नाही. जनतेच्या प्रश्नांसाठी मी सतत लढत राहिलो. त्यासाठी रस्त्यावर उतरुन आंदोलन केले. या आंदोलनामुळे माझ्यावर 80 पेक्षा जास्त गुन्हे दाखल केले. परंतु मी मागे वळून पाहिलेच नाही. उलट पक्षाचे मोठे बळ माझ्या पाठिशी असल्याने मी कधीच मागे हटलो नाही. मधल्या काळात सावकारीच प्रस्थ मोठ्या प्रमाणात सुरु होते. त्यामुळे सामान्य समाज सावकारी फाशात अडकून भरडला जात होता. विशेष म्हणजे ब-याच निष्पापानांही याचे बळी ठरावे लागत होते. अशावेळी मी सावकारी पाशात होरपळणा-या लोकांना संकटातून बाहेर काढण्यासाठीदेखील या मतदारसंघात निकराचा लढा दिला आणि तब्बल 566 एकर जमीन सावकारी पाशातून सोडून गरिबांना त्यांची हक्काची जमीन मिळवून दिली. या आंदोलनासह लोकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने रस्त्यावर उतरुन येथील व्यवस्थेशी दोन हात करण्यासाठी सदैव पुढे राहिलो. यासोबतच सामाजिक कार्यातदेखील मी कधीच मागे नाही. यामध्ये दरवर्षी सर्वधर्मीय सामूदायिक विवाह सोहळा आयोजन करुन अनेक गरीब, गरजू, अडलेल्यांची रिती-रिवाजासह सन्मानपूर्वक लग्न लावून देण्याचे कार्यही मी नेहमीच करीत आहे. या कार्यालाही तब्बल 22 वर्षे पूर्ण झाली आहेत. या कालावधीत तब्बल 2 हजार 450 पेक्षा जास्त विवाह लावून दिले आहेत. पक्षाचा एक निष्ठावान कार्यकर्ता म्हणून मला या माध्यमातून जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली. यापुढेही एक लोकप्रतिनिधी म्हणून मला चाकूर-अहदमपूर विधानसभा मतदारसंघात प्रतिनिधित्वाची संधी मिळावी, अशी माझी मागणी आहे. चाकूर-अहमदपूर विधानसभा मतदारसंघ हा भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. आतापर्यंत ब-याचदा भाजपच्या नेत्यांनीच या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. अजूनही या मतदारसंघात भाजपची ताकद मोठी असून, पक्षाने माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी देऊन पक्षाचे बळ उभे केल्यास कितीही मोठे आव्हान असू द्या, येथे भाजपचीच सीट लागू शकते. त्यामुळे पक्षाने मला एकदा या मतदारसंघात संधी देऊन पाहावी, या संधीचे मी नक्कीच सोने करेन आणि पक्षवाढीसाठी जसा सदस्य नोंदणीच्या मोहिमेपासून जिल्ह्यात भाजपचे जाळे मजबूत करण्यासाठी आजपर्यंत तडफेने काम केले, तीच तडफ पुढेही कायम राहील आणि या माध्यमातून पक्ष अधिक बळकट करता येईल. अर्थात, त्यासाठी दोन्ही तालुक्यांत निष्ठावान आणि मजबूत नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांची सक्षम फळी आहे. त्यासाठी ही जागा भाजपला सोडवून घ्यावी आणि माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी द्यावी, एवढीच माझी विनंती आहे. पक्ष याचा निश्चितच विचार करेल आणि मला योग्य न्याय मिळेल, याची मला खात्री आहे.

# अहमदपूर-चाकूर मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार

- पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत अहमदपूर चाकूर विधानसभा मतदारसंघातील विकासाचा 62 वर्षातील अनुशेष भरुन काढणार.
- मतदारसंघातील सिंचनाचे क्षेत्र वाढवुन काळ्या आईला हिरवा शालू नेसवणार....
- जिल्हा परिषद शाळेचा दर्जा सुधारुन CBSC, ICS पॅटर्न शासकीय शाळांतून राबवणार.
- गाव तिथे स्माशानभुमी हा उपक्रम राबवणार.
- चाकूर आणि अहमदपूर येथे उपजिल्हा रुग्णालय उभारुन अद्यावत दर्जाच्या यंत्रसामग्री सह तालुक्यातील रुग्ण बाहेर हास्पिटल ला जाण्याची गरज राहणार नाही याची काळजी घेणार.
- मतदारसंघातील 1000 किमी चे शेत रस्ते मोकळे करणार.
- UPSC, MPSC व इतर स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केंद्र चाकुर व अहमदपूर शहरात उभारुन पुणे, मुंबई व दिल्ली येथे मिळणारे उच्च दर्जाचे शिक्षण आपल्या शहरात उपलब्ध करुन देणार.
- सर्व विभागाचे अधिकारी सोबत घेऊन विभागनिहाय महिन्यातुन एक दिवस आमदार आपल्या दारी उपक्रम राबवणार व जनतेचे प्रश्न जनतेच्या दारातच सोडवणार.
- मतदारसंघातील टक्केवारी पद्धत बंद करुन भ्रष्टाचाराचा बिमोड करणार व निकृष्ट दर्जाची कामे यापुढील काळात होणार नाहीत तर उत्कृष्ट दर्जाची कामे उभारणार.
- ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा सुधारुन आवश्यकतेनुसार आढावा घेऊन आणखी नविन 25 प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणार.
- नळेगाव,जानवळ,वडवळ,चापोली रोहिणा, किनगाव,हाडोळती,आंधोरी,खंडाळी,रोकडा सावरगाव,शिरुर ताजबंद आदी ठिकाणी ग्रामीण रुग्णालय उभारुन त्या भागातील रुग्णांची सोय करणार.
- अहमदपूर व चाकूर शहरालगत डिजिटल MIDC उभारुन मोठे उद्योग या भागात उभारणार व या भागातील तरुणांच्या हाताला रोजगार आपल्या भागात मिळवुन देणार.
- मतदारसंघातील विजेचा जो सध्या बट्ट्याबोळ झाला आहे त्याला एकदम शिस्त लावणार व शेतकऱ्यांना दिलासा देणार...
- अहमदपूर व चाकूर तालुक्यातील सर्व ग्रामीण रस्ते पक्के बांधुन ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विणणार...
- चाकूर येथे मिनिबस डेपो उभारुन गाव तिथे बस चालु करणार.
- अहमदपूर व चाकूर शहरात अद्यावत सुविधा युक्त जनसंपर्क कार्यालयातुन सर्वसामान्य जनतेची कामे मोफत व तात्काळ होतील याकडे कटाक्षाने लक्ष देणार.
- मतदारसंघातील प्रत्येक गावात नळयोजना राबवणार व शुद्ध जल प्रत्येकाच्या दारात मिळेल अशी योजनेची अंमलबजावणी करणार..
- मागेल त्याला घर,विहिर,गोठा,शेततळे, देणार आणि या योजनेची अंमलबजावणी ज्या पंचायत समितीच्या माध्यमातून होते तिथला भ्रष्टाचार मोडुन काढणार.
- मतदारसंघातील कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलातील अनेक बदल सुचवून त्यामध्ये पारदर्शकता व खर्या अर्थाने सदरक्षणाय व खलनिग्रहणाय या वाक्याचा बोध प्रत्यक्षात येईल याची खबरदारी घेणार..
- महिला, विद्यार्थी, विविध क्षेत्रातील व्यापारी प्रतिष्ठान यांना सुलभतेने अर्थ पुरवठा होईल याकरिता विविध बॅंकेच्या व्यवस्थापनात समन्वयाकाची भक्कम भुमिका राबवणार.
- मतदारसंघातील विविध धार्मिक स्थळांना पर्यटनाच्या अ दर्जा मिळवून देऊन भक्तांना विविध सुविधा पुरविणार.
- लातूररोड, चाकुर, अहमदपूर ते नांदेड रेल्वे मार्गाला गती देऊन रेल्वेचे जाळे निर्माण करणार.
- लाडकी बहिण व वृद्धापकाळतील आधार असणारी श्रावणबाळ,अपंग व निराधार पेंशन 3000 रुपये प्रति महिना मिळण्यासाठी विधानभवनात आवाज उठवणार.
- बचत गटाच्या माध्यमातून महिलांना गृह उद्योगास चालना देऊन उत्पादित मालाला मार्केट मिळवून देऊन महिलांना स्वावलंबी बनवणार.
- मतदारसंघातील खेळाडू साठी क्रिडा संकुल उभारुन खेळाला नवी उभारी देणार.
- भविष्यकाळात हा मतदारसंघ सांस्कृतिक मतदारसंघ म्हणून ओळख निर्माण करणार..
- जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना सहकारी तत्वावरच चालु करणार...



# प्रस्तावना

भाजपच्या निष्ठावान नेते, पदाधिकाऱ्यांत बालाजी पाटील चाकूरकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. लोकांच्या प्रश्नांसाठी सतत धडपडणारा, थेट लोकांमध्ये राहून लोकांच्याच प्रश्नांसाठी स्थानिक प्रशासन किंवा बेजबाबदार नेतृत्वाशी नेहमीच दोन हात करण्यास सदैव सज्ज असलेला आणि अडअडचणी, संकट काळात मदतीसाठी धावून जाणारा आणि पक्ष कार्यासाठी स्वत:ला झोकून देणारा हाडाचा कार्यकर्ता ते नेता अशी जिल्ह्यात ओळख असलेले एक रांगडे, धडाडीचे व्यक्तिमत्त्व आहे. पक्षाने दिलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडतानाच पक्षवाढीसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करुन जिल्ह्यात गेल्या 35 वर्षांपासून पक्षाला बळ देण्याचे काम ते करतात. त्यामुळे जिल्ह्यात तर पक्षाचे बळ वाढलेले आहेच. सोबत अहमदपूर-चाकूर विधानसभा मतदारसंघात तळागाळात संपर्क ठेवून आणि प्रत्यक्ष त्यांच्यासाठी सतत धावत जाऊन काम करीत असल्याने सर्वसामान्यांशी त्यांची थेट नाळ जुळलेली आहे. अशा धडाडीच्या निष्ठावान नेत्याला आणखी बळ देण्यासाठी आगामी विधानसभा निवडणुकीत अहमदपूर-चाकूर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी द्यायला हवी. कारण बदलत्या राजकीय परिस्थितीत पक्षाला निष्ठावान पक्षनेत्याची खूप गरज आहे. बालाजी पाटील चाकूरकर गेल्या 35 वर्षांपासून भाजपचा एक कार्यकर्ता ते पक्षाचे जिल्हा उपाध्यक्षपदापर्यंत विविध पदांवर काम करताना दिलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडून पदाला न्याय देण्याची भूमिका कायम घेतली. पक्षकार्यात एक पदाधिकारी म्हणून नव्हे तर कार्यकर्ता म्हणूनच झपाटल्यागत काम करण्याचे काम बालाजी पाटील चाकूरकर यांनी केले. त्यामुळे चाकूर तालुक्यातच नव्हे, तर जिल्ह्यात पक्षकार्यातून एक चळवळ उभी करण्याचे काम त्यांनी केले. एकीकडे पक्षाचे धडाडीने कार्य करतानाच केवळ राजकारण न करता समाजकारणातही ते सातत्याने सक्रीय असतात. मग ते ग्रामीण भागात अडल्या-नडलेल्या लोकांना मदत असेल, पैशाअभावी दवाखान्यात दूरवर नेण्याची अडचण असेल, तर तिथपर्यंत पोचवण्याचे काम असेल, निराधारांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न असेल तर रक्तदान शिबिर, विविध स्पर्धा, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार असो की, या भागातील विविध प्रश्नांसाठी लढणे असो, या प्रत्येक गोष्टीत हिरीरीने सहभाग नोंदवून जनहिताचे कार्य करण्यात ते आपला अधिकाधिक वेळ देतात.

आपल्या भागातील प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सतत रस्त्यावर उतरुन लढा दिला आहे. मग तो नळेगाव साखर कारखाना सुरु करण्यासाठीचा लढा असेल किंवा सावकाराच्या पाशात अडकलेल्या शेतकऱ्यांचा प्रश्न असेल, यासाठी त्यांनी संघर्ष करुन न्याय मिळवून देण्याचे काम केले. आपल्या भागातील शेतकऱ्यांना आधार ठरणारा नळेगाव साखर कारखाना सुरु करण्यासाठी खूप संघर्ष केला. परंतु येथील राजकीय व्यवस्थेने सातत्याने अनास्था दाखवून हा प्रश्न रखडत ठेवण्याचा प्रयत्न केला. तसेच शेतकरी, शेतमजुरांसह सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलन करणे असेल किंवा लढा देणे असेल, त्यावेळी बालाजी पाटील चाकूरकर यांनी सक्रीय सहभाग नोंदवतानाच प्रसंगी संघर्ष करण्याची तयारी त्यांनी कायम ठेवली. त्यामुळे एक संघर्षशील नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. महत्त्वाचे म्हणजे त्यांनी सावकारांनी बळकावलेली जवळपास 566 एकर जमीन पीडित लोकांना मिळवून देण्याचे काम त्यांनी केले. यासाठी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला. परंतु त्यांनी मागे वळून पाहिले नाही, तर उलट थेट सावकारांशी भिडून पीडितांना न्याय दिला. जनआंदोलनात हिरीरीने सहभाग नोंदवून सामान्यांना न्याय देण्यासाठी संघर्ष केला. त्यामुळे त्यांच्या विरोधात 80 गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यांनी लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेकदा आमरण उपोषण केले. एका महत्त्वाच्या प्रश्नासाठी तर त्यांनी 92 दिवस उपोषण केले आणि तो प्रश्न सोडविला. जनतेसाठी लढताना 92 दिवस तुरुंगवासही भोगावा लागला. परंतु ते कधीच मागे हटले नाहीत.

बालाजी पाटील मित्रमंडळाच्या वतीने जिल्ह्यात आणि चाकूर-अहमदपूर तालुक्यात विविध उपक्रम राबवून सतत लोकसेवेत राहण्याचे काम ते करीत आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे दरवर्षी सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा आयोजित करुन त्यांचा थेट विवाह लावून देण्याचे महत्त्कार्यही ते करीत आहेत. त्यांचे हे कार्य 2003 पासून अखंडपणे सुरु आहे. या माध्यमातून त्यांनी आतापर्यंत 2 हजार 450 विवाह लावण्याचे पुण्य कर्म केले. एवढेच नव्हे, तर कोणत्या ना कोणत्या कारणावरुन मोडलेले संसार पुढाकार घेऊन जोडण्याचे काम केले. त्यांनी सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यातून अनेकांच्या जन्माच्या गाठी बांधतानाच अनेकांचे मोडलेले संसार पुन्हा जोडून त्यांची विस्कटलेली घडी बसविण्याचे काम ते पुढाकार घेऊन करतात. राजकारण राजकारणाच्या ठिकाणी परंतु राजकारणापेक्षा सामाजिक कार्यातून त्यांनी लोकांशी जोडत आपली एक आगळीवेगळी कार्यशील नेता म्हणून ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांपासून ते गावपातळीवरील ग्रामस्थ यांच्यापर्यंत त्यांची नाळ कायम जोडलेली आहे. थेट जनसंपर्क आणि कार्याची धडाडी यामुळे मतदारसंघात त्यांच्या मागे सर्वच समाजातील घटकांची मोठी शक्ती उभी आहे. तसेच लिंगायत समाजातील एक धाडसी आणि धडाडीचे व्यक्तिमत्त्व म्हणून ते ओळखले जातात. त्यामुळे लिंगायत समाजही त्यांच्या पाठीशी आहे. पक्षीय कार्यातही ते गेल्या 35 वर्षांपासून सक्रीय आहेत. त्यांनी पक्षाचा एक कार्यकर्ता ते आज जिल्हा उपाध्यक्षपदापर्यंत विविध पदांवर कार्य केले आहे. भाजप किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी शेतकऱ्यांना सोबत घेऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी लढतानाच त्यांचे विविध प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले. शेती मालाला योग्य दर मिळावा, यासाठी सरकारसोबत संघर्षही केला. तसेच विरोधात असताना नागपूरपर्यंतच्या पायी दिंडीत सहभाग नोंदवून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. तसेच संजय गांधी निराधार योजनेचे चेअरमन म्हणून काम करताना निराधार, परित्यक्तांसह जे अडले, नडलेले आहेत, त्यांच्यासाठी काम केले आणि त्यांना न्याय मिळवून दिला. मागच्या अनेक वर्षांपासून ते भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणून पक्षाचे काम पाहात आहेत. पक्षाचे काम करताना स्थानिक पातळीवरील निवडणुकांपासून विधानसभा, लोकसभा निवडणुकीतही पक्षाला चाकूर-अहमदपूर तालुक्यातून बळ देण्याचे काम केले. अर्थात चाकूर तालुक्यातून मताधिक्य मोठ्या प्रमाणात देण्याचे काम केले. तसेच स्थानिक पातळीवर निवडणुकांतही भाजपची ताकद दाखवून दिली. आगामी विधानसभा निवडणुकीतही अहमदपूर-चाकूर मतदारसंघातील वातावरण भाजपला अनुकूल आहे.

एक निष्ठावान कार्यकर्ता म्हणून आगामी विधानसभा निवडणुकीत अहमदपूर-चाकूर विधानसभा मतदारसंघात बालाजी पाटील चाकूरकर यांच्या नावाचा पक्षश्रेष्ठींनी विचार करावा. कारण त्यांनी पक्षासाठी कार्य करतानाच मतदारसंघातील लोकांशी कायम संपर्क ठेवून पक्की नाळ जोडली आहे. शालेय स्तरापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार, त्यानंतर अभाविपच्या माध्यमातून शहरमंत्री, तालुकामंत्री, कार्यवाहक, सहकार्यवाहक अशा विविध पदांवर काम केले. यातून विद्यार्थी दशेत विद्यार्थी कल्याणाचे कार्य, कार्य नंतर भाजपच्या विविध पदावर कार्य, यात किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष म्हणून धडाडीने कार्य केले. आज जिल्हा उपाध्यक्ष म्हणून ते कार्य करीत आहेत. या कार्यातून पक्षात त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे एक सक्षम उमेदवार आणि निष्ठावान नेता म्हणून आगामी विधानसभा निवडणुकीत अहमदपूर-चाकूर विधानसभा मतदारसंघात त्यांच्या नावाला पसंती देण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

**- बालाजी पाटील चाकूरकर मित्रमंडळ**





## 22 वर्षांपासून अविरत सेवा...

बालाजी पाटील चाकूरकर मित्रमंडळातर्फे गेल्या 22 वर्षांपासून सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. आजतागायात हजारो जोडप्यांचा विवाह या माध्यमातून करण्यात आला.

आर्थिक विवंचनेतून कुटुंबाला वाचविण्यासाठी मित्रमंडळाचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. राजकारणातील विविध मान्यवर व नागरिक या सोहळ्यास उपस्थित राहून मित्रमंडळाच्या जनसेवेचे कौतूक करतात. मित्रमंडळाच्या वतीने आयोजित सामूहिक विवाह सोहळ्यातील जोडपे आणि सोहळ्याला जमलेली गर्दी.







अहमदपूर शहरातील महिलांनी नवदुर्गा शक्ती नवरात्र मंडळाच्या माध्यमातून प्रथमच देवीची स्थापना केली. या देवीची पूजा व आरती करण्याचा मान मिळाला.. आणि मोठ्या संख्येने उपस्थित माता भगिनींनी आशीर्वाद दिला.

अहमदपूर शहरातील नागरिकांशी संवाद साधून वडिलधाऱ्यांचा आशीर्वाद घेतला व नागरिकांच्या प्रश्नासंदर्भात चर्चा केली.

भक्तीस्थळ अहमदपूर येथून निघालेल्या विरशैव लिंगायत सन्मान यात्रेचा समारोप शक्तीस्थळ मंगळवेढा येथे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी ह. भ. प. गहिनीनाथ महाराज औसेकर, खासदार डॉ. अजित गोपछडे, माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर, मांजरसुंबा येथील शिवाचार्य महाराज, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर, अर्चनाताई पाटील चाकूरकर आदी मान्यवर उपस्थित होते





लिंगायत सन्मान यात्रा, मंगळवेढा जि. सोलापूर येथे दाखल झाली, तेव्हा यात्रेतील प्रमुख लोकांशी संवाद साधला. या यात्रेत मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जानवाया दुर्बलांच्या दुःख आणि वेदना वाहत्या राहो सदा हृंदातून संवेदना**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर येथे बोथी तांडा ता. चाकूर येथील सौ. रुपाबाई जयसिंग राठोड यांच्या तब्येतीची विचारपूस करून अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते यांना विशेष काळजी घेण्याची विनंती केली.








अहमदपूर शहरातील लेक्चरर कॉलनीतील दुर्गामातेची पूजा केली. यावेळी आरतीसाठी भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. यावेळी हात उंचावून उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे आशीर्वाद दिला.

खंडाळी, ता. अहमदपूर येथे ग्रामस्थांची भेट घेतली. यावेळी ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत हात उंचावून पाठींबा दिला....

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांच्या नागपूर ते नाणिजपर्यंत निघालेल्या वसुंधरा दिंडीचे स्वागत करुन पायी दिंडीत सहभाग नोंदवला.










मरशिवनी ता. अहमदपूर येथे सोयाबीन पिकाचे अतोनात नुकसान झाले. त्याची पाहणी बालाजी पाटील चाकूरकर यांनी केली. या नुकसानीचा पाठपुरावा करून त्वरीत मोबदला मिळवून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोरेवाडी ता. अहमदपूर येथील कु. सागर शंतनू या भूमिपुत्राने किकबॉक्सिंग या स्पर्धेत आशिया खंडातील कम्बोडियात आशियन गेममध्ये निवड झाली होती. तिथे शंतनूने भारताला सिल्वर मेडल मिळवून दिले, अशीच मेहनत घेऊन पुढे 2028 ला होणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये प्रवेश मिळावा, हिच भारतीयांची अपेक्षा...तुझ्या या दिव्य यशाबद्दल हार्दिक हार्दिक अभिनंदन.

अहमदपूर येथील दसरा महोत्सवात आचार्य गुरुराज महाराज यांचा सत्कार करताना बालाजी पाटील चाकूरकर

बंजारा समाज दसरा महोत्सवात गुरुचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला...









विरशैव लिंगायत सन्मान यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी अहमदपूर येथील भक्तीस्थळ येथे झालेल्या जाहीर कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना बालाजी पाटील चाकूरकर व उपस्थित प्रचंड समाज बांधव.

भक्तीस्थळ अहमदपूर येथे विरशैव लिंगायत सन्मान यात्रेच्या शुभारंभप्रसंगी खासदार डॉ. अजितजी गोपछडे साहेब व सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्यासह बालाजी पाटील चाकूरकर यांचा सत्कार करण्यात आला...

राष्ट्रीय जंगम समाज संघटनेच्या वतीने लातूर येथे आयोजित विरशैव लिंगायत सन्मान यात्रेच्या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमात बालाजी पाटील चाकूरकर यांना सन्मानित करण्यात आले.








रामनवमी उत्सवास हजेरी लावून उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेतली. तसेच नियोजन चांगले करण्यासंदर्भात सूचना केल्या.

चाकूर सोसायटी निवडणूक किसान परिवर्तन पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ....चाकूरचे आराध्य दैवत भवानी मातेची पूजा करून प्रचंड उत्साहात शेकडो शेतकरी मतदार बांधवांच्या उपस्थितीत केला. यावेळी सोसायटी सदस्यांच्या उपस्थितीत विजयाचा निर्धार करीत जयघोष करण्यात आला.

जुना हनुमान चौक चाकूर येथे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी तरुण वर्गाचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. या जयंती महोत्सवास हजेरी लावून महाराजांना मानवंदना दिली.







चाकूर शहरात शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी उपस्थित शिवभक्तांसमवेत महाराजांना वंदन केले आणि त्यांचे विचार तळागाळापर्यंत पाहेचावेत, म्हणून सर्वांनी प्रयत्न करावेत, यासाठी कामना केली.

साबरमती आश्रम अहमदाबाद येथे भेट दिली.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय सहसंचालक मा. श्री. अनिलकुमार  गायकवाडसाहेब आष्टामोड-तिवटग्याळ उदगीर रस्त्याची पाहणी करण्यासाठी आले असता त्यांचे स्वागत करताना KPCL चे संचालक श्री. गजानन पोकलवारजी, कार्यकारी अभियंता श्री. अभंग साहेब व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते...









आदरणीय नितीनजी गडकरीसाहेब यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. चाकूर-अहमदपूर मतदारसंघातील विकासकामांसंदर्भात चर्चा केली.

आपल्या देशाच्या स्वातंत्र्य अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने नवी दिल्ली येथील जुने महाराष्ट्र सदन येथे आपल्या तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण कमीशनर श्री शामलाल गोयल साहेब (IS) यांच्या हस्ते संपन्न झाले... याप्रसंगी श्रीमती निधी पांडे (IS Cader Maharashtra), श्री राजेश अडपवार (Additional comissioner) यांच्यासह अनेक अधिकारी व पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी  महाराजांचा राज्याभिषेक सोहळा झालेल्या स्थळाचे दर्शन घेतले.

महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चवदार तळ्याचे पाणी अस्पृश्यांनाही मिळालेच पाहिजे, यासाठी सत्याग्रह केला...त्या चवदार तळ्याचे पाणी सत्यागृहामुळे अस्पृश्यांना खुले करणारा ठराव मंजूर करुन सर्वांसाठी खुला केला. ते चौदा विहीरी असणारे चवदार तळे येथे भेट दिली.







चाकूरचे माजी नगराध्यक्ष तथा बांधकाम सभापती श्रीमान मिलिंदराव महालिंगे यांच्या रिंगरोड स्थित बांधकामाचा शुभारंभ करताना बालाजी पाटील चाकूरकर, नगरसेवक श्रीमान राम कसबे, नगरसेवक श्रीमान नरसिंग गोलावार, नगरसेवक शिवदर्शन स्वामी, वैभव धोंडगे आदी मान्यवर उपस्थित होते....

चापोली येथील जगदंबा देवीची आरती केली व चाकूर-अहमदपूर मतदारसंघाचा सर्वांगीण विकास व्हावा, या साठी देवीकडे प्रार्थना केली.

सुनेगाव सा ता. अहमदपूर येथे भेटीगाठीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.... यावेळी हात उंचावून गावकऱ्यांनी पाठींबा दिला व आशीर्वाद दिला....







अहमदपूर-चाकूर विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली. यावेळी देवेंद्रजींनी त्यासाठी प्रयत्न करेन, अशी ग्वाही दिली.

जगद् गुरु नरेंद्राचार्य महाराज यांच्या उपपीठ मठ सिम्हुरगव्हाण ता. पाथरी, जि. परभणी येथे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला. त्यावेळी त्यांनी अगदी प्रसन्न मुद्रेने आशीर्वाद दिला.







चापोली, ता. चाकूर येथील गावकऱ्यांनी स्मशानभूमीच्या रस्त्यासाठी बेमुदत उपोषण आरंभिले. यावेळी उपोषणार्थी लोकांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला.

चाकूर येथील जय हनुमान गणेश मंडळांच्या श्री ची पूजा व आरती करुन आशीर्वाद घेतला.

लातूररोड येथील जय भवानी गणेश मंडळांच्या माता भगिनींनीही आशीर्वाद दिला.







राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज समाधी सोहळा निमित्ताने आटोळा, ता. चाकूर ते भक्तीस्थळ अहमदपूर पायी दिंडी चाकूर येथे आली. त्यावेळी बालाजी पाटील चाकूरकर यांनी सर्वांचे शाल श्रीफळ व हार घालून स्वागत केले.

चापोली येथील बाल-गोपालांसोबत एक आनंदाचा क्षण.

ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेऊन सदैव तत्पर राहून पाठपुरावा करण्याचे आश्वास दिले.





राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी अहमदपूर-चाकूर विधानसभा मतदारसंघातून भाजपकडून तिकीट मिळावे, यासाठी मला आशीर्वाद दिला... व मा. मुख्यमंत्री ,मा. गडकरी साहेब, भाजपचे प्रदेशाध्यक्ष मा. ना. चंद्रकांतदादा पाटील, पालकमंत्री मा. ना. संभाजीराव पाटील निलंगेकर व जिल्हाध्यक्ष मा. श्री नागनाथअण्णा निडवदे यांना लेखी पत्र दिले आणि कोणत्याही परिस्थितीत बालाजी पाटील चाकूरकर यांनाच अहमदपूर विधानसभा मतदारसंघातून भाजपची उमेदवारी देण्याचा आग्रह केला.

आज श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयीजी का पुण्यस्मरण दिन.... उनके पुण्यतिथी के अवसर पर विजय घाट स्थित स्मृती स्थल पर राष्ट्र गान के साथ श्रद्धासुमन अर्पित कर अभिवादन किया. मेरे साथ महाराष्ट्र भाजपा प्रवक्ता बहन रिता सिंगजी, उत्तर प्रदेश व्यापार संघटन प्रकोष्ठ के प्रदेश संयोजक श्री. राम मिश्राजी, उनकी धर्मपत्नी श्रीमती मिस्राजी, दिल्ली के विहार मंडल के महामंत्री सोनु सिंगजी एवं श्रद्धेय अटलजी के मार्ग पर चलनेवाले बहोत सारे भाई उपस्थित थे !.......सदैव अटल, विजय घाट, नई दिल्ली



कोरोनात अडचणीत सापडलेल्या दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला सरसगट प्रतिलिटर 10 रुपये अनुदान द्यावे, दूध भुकटी निर्यातीला प्रतिकिलो 50 रुपये अनुदान मिळावे आणि गाईच्या दुधाचा खरेदी दर 30 रुपये प्रतिलिटर करावा, या मागणीसाठी भाजपा महायुतीच्या वतीने येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आदोलनात भाजपा आणि महायुतीतील रासप, रिपाई आठवले गट व कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधींसह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.






कोरोनाच्या काळात भाजपाच्या वतीने गरजूंना पोळी-भाजी वाटप करण्यात आले आणि अनेकांची भूक भागविली. याप्रसंगी माजी शहराध्यक्ष बालासाहेब पांडे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष गजानन करेवाड, रमेश सोनटक्के, योगेश ढोबळे, अजित पेन्सलवार सावकार, सुरेशअन्ना सोनटक्के आदी उपस्थित होते.

हेलिकॉप्टर दुर्घटनेत विरगती प्राप्त झालेले भारताचे पहिले CDS (chief of defence staff) जनरल स्व. बिपीनजी रावत व त्यांच्या पत्नी स्व. सौ. मधुलिका रावत यांचे नवी दिल्ली येथील निवासस्थानी अंत्यदर्शन घेऊन पुष्पांजली अर्पण केली व त्यांच्या पुण्यात्म्याला चिरशांती लाभावी, यासाठी प्रार्थना केली.



चाकूरचे सुप्रसिध्द डॉ. चंद्रप्रकाश नागिमे साहेब यांनी प्रधानमंत्री सहाय्यता निधीसाठी 50 हजार रुपयांचा निधी धनादेशाद्वारे भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर यांच्याकडे सुपुर्द केला. डॉ. साहेबांचे भारतीय जनता पार्टी व चाकूरवासीय जनतेच्या वतीने जाहीर आभार.




भाजप नेते बालाजी पाटील चाकूरकर यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान करताना रक्तदाते.



चाकूर येथे महात्मा बस्वेश्वर चौक नांदेड-लातूर रोड येथे ध्वजारोहण करताना बालाजी पाटील चाकूरकर व सोबत बस्वप्रेमी




SOS बालग्राम लातूर येथे आंतरजातीय विवाह थाटात पार पडला. त्यावेळी मा.खासदार सुनिलजी गायकवाड, मा. हरिभाऊ गायकवाड, बालाजी पाटील चाकूरकर यांच्यासह चि. सौ. का. पुनम व चि. विकास हे नवदाम्पत्य.





चाकूर येथे बालाजी पाटील मित्रमंडळाच्या वतीने मा. खा. सुनिलजी गायकवाड साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत मुस्लीम बांधवाना ईफ्तार पार्टी देण्यात आली.

राजधानी दिल्ली येथे भाजपच्या वतीने ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुषमा स्वराज, नितीन गडकरी यांच्यासोबत बालाजी पाटील चाकूरकर. चाकूर येथे विकास कामाचा शुभारंभ करताना बालाजी पाटील चाकूरकर.



# जनसेवकाची शपथ

समाजसेवा हेच जीवन,
माझ्या मनीचा मंत्र,
सर्वांसाठी लढणे हाच,
माझा धर्म अन् कर्तव्य मंत्र।

जनतेच्या दुःखात वाहीन,
त्यांचे अश्रू पुसायला,
न्यायाचे शस्त्र उचलून,
अन्यायाचा सामना करायला।

गरिबांसाठी उभा राहीन,
त्यांच्या आशा-स्वप्नांकरिता,
त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवीन,
माझ्या छोट्याशा प्रयत्नांकरिता।

जनसेवक मी, जनासाठी,
न्याय, समानता हेच ध्येय,
माझे कर्तव्य पूर्ण करीन,
आनंदाने, निश्चयाने, प्रखर तेज।

## होय हे आम्हाला करायचे आहे

- येल्लमा देवीची प्रतिकृती
- अहिल्यादेवी होळकरांचा पुतळा, बाळुमामा सभागृह
- भगवान गडाच्या धर्तीवर दुसऱ्या भगवानगडाची प्रतिकृती स्थापित करणे
- शादीखाना अहमदपूर, चाकूर, नळेगाव आणि किनगाव येथे उभारणे
- शिवलिंग शिवाचार्य महाराजांचा पुतळा उभारणे
- महात्मा बसवेश्वररांचा अश्वारुढ पुतळा उभारणे
- छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतीक भवनाची निर्मिती
- उदगीरच्या धरतीवर अहमदपूरमध्ये बौध्दविहार उभारणे
- अण्णाभाऊ साठे यांच्या नाट्यगृहाची निर्मिती
- जिवा महाल सार्वजनिक मंगल कार्यालयाची निर्मिती
- महाराष्ट्रातील सर्वात मोठे वाल्मिक ऋषी वाचनालयाची उभारणी
- सेवालाल महाराज सभागृहाची निर्मिती
- सवाता माळी सभागृहाची निर्मिती करणे
- वसंतराव नाईक सार्वजनिक वाचनालयाची निर्मिती करणे

16

**बालाजी पाटील चाकूरकर**
**Balaji Patil Chakurkar**





